**स.फौ.के. नं. ७४/२०१८**

**नि. क्र. ५०**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०७ चा जबाब शपथेवर सुरू.</u>**

**नाव** – संदीप राजाराम देसाई,

**वय**– ४८ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (आरटीओ),

**सध्या नेमणूक** – डेप्युटी आरटीओ ऑफीस, सांगली.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१**. सन २०१५ ते २०१८ या कालावधीत मी आरटीओ, रत्नागिरी येथे कार्यरत होतो. दिनांक १६/०१/२०१८ रोजी मी आरटीओ रत्नागिरी येथे वाहन निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. आमच्या कार्यालयात बिनतारी संदेश प्राप्त झाला होता की, अपघातग्रस्त मोटार सायकल आणि एका कंटेनरचा यांत्रीकी निरीक्षण अहवाल दयावयाचा आहे. दुचाकी बजाज कंपनीची असून तिचा क्रमांक एमएच–०८–एएल–२२६७ असा होता. चारचाकी वाहन एक मोठा कंटेनर असून त्याचा क्रमांक एमएच–४६–एएफ–८१०८ असा होता.

**०२**. मला सदरचा बिनतारी संदेश देवरुख पोलीस ठाण्यामार्फत प्राप्त झाला होता. मला आता दाखविण्यात आलेला बिनतारी संदेश तोच आहे. दिनांक १८/०१/२०१८ रोजी मी अपघातग्रस्त दोन्ही वाहनांची यांत्रीकी तपासणी केली. अपघातग्रस्त वाहन चारचाकी ट्रेलर हा अपघातस्थळ मौजे वांद्री येथे उभा होता. दुचाकी देवरुख पोलीस ठाण्याच्या आवारात होती. सबब, दोन्ही वाहनांची तपासणी त्या–त्या ठिकाणी झाली.

**०३**. चारचाकी वाहन कंटेनर एमएच–४६–एएफ–८१०८ हा Road worthy Condition मध्ये होता. कंटेनरचा उजवा बाजूकडील समोरील बंपर वाकलेला होता. वाहनाचे ब्रेक कार्यरत होते. वाहनाचे स्ट्रेअरींग सुस्थीतीत होते. वाहनाचे इंजिन सुस्थीतीत होते. गियर बॉक्स व Differential हे दोन्ही सुस्थीतीत

होते. माझा यांत्रीकी निरीक्षण अहवालानंतर असे मत होते की, सदरचे वाहन सुस्थीतीत होते. सदरचा अपघात वाहनामध्ये कोणत्याही यांत्रीकी बिघाडामुळे झाला नव्हता. तसा मी रीतसर अहवाल पोलीसांच्या मागणीनुसार देवु केला होता. मला आता दाखविण्यात आलेला यांत्रीकी निरीक्षण अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **चारचाकी वाहनाच्या अहवालाला निशाणी ५१** देण्यात येते.

०४. दुसरे अपघातग्रस्त वाहन दुचाकी बजाज कंपनीची गाडी क्र. एमएच–०८–एएल–२२६७ याची तपासणी मी देवरुख पोलीस ठाण्याच्या आवारातच केली. माझ्या तपासणीत असे निदर्शनास आले की, दुचाकीचे मागील उजव्या बाजूकडील सस्पेंशन तुटलेले होते. दुचाकीचे सायलेंसर ब्रॅकेट तुटले होते. दुचाकीचा उजवा व डावा आरसा फुटलेला होता. दुचाकीचा हँडल वाकलेला होता. दुचाकीची इंधन टाकीचे नुकसान झाले होते. सदरची दुचाकी Road Worthy Condition मध्ये नव्हती. सदरचे वाहन रस्त्यावर चालविण्याच्या सुस्थीतीत नसल्याने त्याबाबत कोणतेही मत अहवालात देण्यात आले नव्हते. तसा मी यांत्रीकी निरीक्षण अहवाल तपासीक अधिकाऱ्यांना मागणीनुसार देवु केला. मला आता दाखविण्यात आलेला अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **दुचाकी अहवालाला निशाणी ५२** देण्यात आले.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेकडुन –**

०५. हे म्हणणे खरे नाही की, अहवालात निरीक्षण करतेवेळी वाहन प्रत्यक्ष चालवून बघितले असे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी गुनहयाची फिर्याद न वाचता Point of impact of damage या रकान्यात As per Police FIR असे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, हा जो रिपोर्ट आहे तो पोलीसांच्या मागणीवरुन मी आरटीओ ऑफीसमध्ये तयार केला. हे म्हणणे खरे आहे की,

अपघातग्रस्त वाहनाची लवकरात लवकर आरटीओ तपासणी होणे गरजेचे असते. हे म्हणणे खरे नाही की, मी अपघातग्रस्त दोन्ही वाहनांची यांत्रीकी तपासणी करुन अहवाल दिला हे मी खोटे नमूद करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.04.22 15:45:48 +0530

**(श्रुती ह. पाटील)**

दि. २२.०४.२०२५

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 22/04/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 22/04/2025 |
| Evidence uploaded on | :- | 22/04/2025 |